# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : १४
## सभावृत्तांत

दिनांक : ५/५/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ५/५/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.काळूराम मारुती पवार
२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
३. मा.रामआधार धारिया
४. मा.उत्तम मुक्ताजी हिरवे
५. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

याशिवाय मा.कारचे - सहा.आयुक्त,मा.चाकणकर- उप नगरसचिव,मा.लडकत - प्र.कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

(सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा. सभापती सभागृहात उपस्थित नव्हते)
खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.उत्तम हिरवे अनुमोदक : मा. रामआधार धारिया

सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा. सभापती सभागृहात उपस्थित नसल्याने मा. तानाजी खाडे यांची सभेच्या अध्यक्षस्थानी निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

(मा.तानाजी खाडे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला -

विषय क्रमांक ५) सर्वोत्कृष्ट सहकारी गृहरचना बक्षीस योजनेबाबत..मा.उत्तम हिरवे,मा.रामआधार धारिया यांचा प्रस्ताव..

ठराव क्रमांक - ४८ विषय क्रमांक - १
दिनांक- ५.५.२०१० विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक- मा.रामआधार धारिया अनुमोदक - मा.उत्तम हिरवे
संदर्भ - मा.सक्षम प्राधिकारी यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/१८१/१० दि.२२/४/२०१०

मा.सक्षम प्राधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

प्रभाग क्र. ७०, मिलिंदनगर पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेकामी र.रू.१०,००,०००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - ४९ विषय क्रमांक - २
दिनांक- ५.५.२०१० विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक- मा.उत्तम हिरवे अनुमोदक - मा.काळुराम पवार
संदर्भ - मा.सक्षम प्राधिकारी यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/१७९/१० दि.२२/४/२०१०

मा.सक्षम प्राधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

प्रभाग क्र. ७०, सुभाषनगर झोपडपट्टीतील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेकामी र.रू.९,७०,५५०/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - ५० विषय क्रमांक - ३
दिनांक- ५.५.२०१० विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक- मा.रामआधार धारिया अनुमोदक - मा.काळुराम पवार
संदर्भ - मा.सक्षम प्राधिकारी यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/१८०/१० दि.२२/४/२०१०

मा.सक्षम प्राधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

प्रभाग क्र. ७१, बलदेवनगर झोपडपट्टीत शौचालयाचे वर मजला वाढविणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणेकामी र.रू.९,००,०००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - ५१ विषय क्रमांक - ४
दिनांक- ५.५.२०१० विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक- मा.उत्तम हिरवे अनुमोदक - मा.रामआधार धारिया
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/१९५/१० दि.२८/४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

ब व ड प्रभागातील नव्याने घोषित होणाऱ्या झोपडपट्टीमध्ये गटर्स व कॉंक्रीट पेव्हींग करणेकामी र.रु.४५,००,०००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.

ठराव क्रमांक - ५२ विषय क्रमांक - ५
दिनांक- ५.५.२०१०
सुचक- मा.उत्तम हिरवे अनुमोदक - मा.रामआधार धारिया
संदर्भ - मा.उत्तम हिरवे,मा.रामआधार धारिया यांचा प्रस्ताव..

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सर्वोत्कृष्ट गृहरचना सोसायटी ठरवणेबाबतचे अटी/शर्ती प्रारुप ठरवणे व बक्षीसांची रक्कम ठरवणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

यानंतर मा.सभाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(तानाजी विठ्ठल खाडे)
सभाध्यक्ष
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/०९/कावि/ ५९९ /२०१०
दिनांक :- ६ / ५ /२०१०

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.